महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे/कालमर्यादा/ईमेलद्वारे**
क्रमांक: संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/२०७ दिनांक : 10 OCT 2018

प्रति,
१. संचालक,
वैद्यकीय शिक्षण / तंत्र शिक्षण / आयुष शिक्षण / उच्च शिक्षण /
कला शिक्षण / दुग्ध व मत्स्य शिक्षण.

२. सर्व परीक्षा समन्वयक/सहाय्यक परीक्षा समन्वयक,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

**विषय : सन २०१८-१९ पासून प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याच्या अनुषंगाने दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

विषयांकित प्रकरणास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याच्या अनुषंगाने बुधवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडल आहे.

सदर इतिवृत्तानुसार आवश्यक कार्यवाही निश्चितपणे त्वरीत करावे, ही विनंती.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
सचिव,
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.**

प्रत माहितीसाठी सविनय सादर,-

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.

(कृ.मा.प.)

D:\Jayant\Note-New Website.docx

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
२. मे. एस.एम.बी. सिस्टम प्रा.लि., मुंबई.
३. मे. आय.बी.एस., मुंबई.
४. मे. एम.के.सी.एल., मुंबई.
५. मे. फोर पिर्लस इन्फोटेक प्रा.लि., पुणे.
६. मे. सिन्थेसिस सोल्युशनस प्रा.लि., मुंबई.
७. मे. कल्प टेक्नोलॉजी प्रा.लि., पुणे,

प्रत,-
निवड नस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

श्री. आ.ए. रायते, भा.प्र.से. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण कामकाज संगणकीकृत प्रणालीने करण्याच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी **बुधवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी** बैठक सभागृह, प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालय येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस उपस्थित असलेल्या मान्यवरांची यादी सोबत जोडली आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण कामकाज संगणकीकृत प्रणालीने करण्याच्या अनुषंगाने दिनांक ११ सप्टेंबर २०१८ व २५ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे मे. कल्प टेक्नॉलॉजीस प्रा. लि., पुणे यांनी महाविद्यालय/अभ्यासक्रम नोंदणी संदर्भात कार्यवाही करण्यात आली असल्याचे नमूद केले व तद्नुषंगाने प्राधिकरणाच्या प्रवेश प्रक्रियेच्या "ऑनलाईन पोर्टल" बाबत संगणकीय सादरीकरण केले, पूर्वी निश्चित केल्याप्रमाणे दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रोजी नोंदणी प्रक्रिया स्थगित करण्यात आली. मे. कल्प टेक्नॉलॉजीस प्रा.लि., पुणे यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रोजी पर्यंत संचालक निहाय अभ्यासक्रमाच्या नोंदणीचा तपशील खालील प्रमाणे सादर केला.

| Sr. No. | Directorate Name | Only registered (Inst Count) | Registered With Details(Inst Count) |
|---|---|---|---|
| 1 | Directorate of AYUSH, Mumbai | 112 | 102 |
| 2 | Maharashtra Council of Agricultural Education and Research, Pune | 182 | 163 |
| 3 | Maharashtra Animal & Fishery Sciences University, Nagpur (No Private College/Institute) | 4 | 3 |
| 4 | Directorate of Technical Education, Mumbai | 1826 | 1685 |
| 5 | Directorate of Higher Education, Pune | 708 | 616 |
| 6 | Directorate of Arts, Mumbai | 6 | 5 |
| 7 | Directorate of Medical Education and Research, Mumbai | 140 | 129 |
| | **Total** | **2978** | **2703** |

३. दिनांक २५/०९/२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे सर्व एजन्सीसजनी प्रवेश प्रक्रिये दरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांसह माहिती मे. कल्प टेक्नॉलॉजीस प्रा.लि., पुणे यांना सादर करावी. मे. कल्प टेक्नॉलॉजीस प्रा. लि., पुणे यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील सामाईक प्रवेशाच्या नोंदणी संबंधी मे. सिन्थेसिस सोलुशन प्रा.लि., पुणे, मे. फोर पिर्लस ईन्फोटेक इंडिया प्रा. लि., पुणे व मे. एस.एम.बी. प्रा.लि., मुंबई व प्रवेश प्रक्रिये

संबंधी मे. आय.बी.एस., मुंबई यांनी आवश्यक माहिती अद्याप दिली नसल्याचे निर्दशनास आणुन दिले व सदरील माहिती लवकरात लवकर मिळण्याची विनंती केली.

४. तसेच महाविद्यालयांनी सादर केलेली माहितीची संबंधीत संचालनालया मार्फत तपासणी होणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

या अनुषंगाने उपस्थित सर्व मान्यवरांशी झालेल्या चर्चेनुसार मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रियेच्या "ऑनलाईन पोर्टल" व प्रवेश मान्यतेच्या प्रक्रियेबाबत खालीलप्रमाणे ठरविण्यात आले,-

अ) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील सामाईक प्रवेशाच्या नोंदणी संबंधी व प्रवेश प्रक्रिये संबंधी ज्या एंजन्सीसने अद्याप माहिती सादर केली नाही, त्यांना सदरील माहिती सादर करण्यास दिनांक ४ ऑक्टोबर २०१८ पर्यंतची मूदत देण्यात आली व तद्नंतर जे माहिती सादर करण्यास असमर्थ ठरतील अशा एंजन्सीसच्या एकुण देयकातून रु. १०,०००/- प्रति दिवस प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

ब) महाविद्यालयांच्या Login मध्ये उपलब्ध केलेल्या माहिती व्यतिरिक्त प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने अदा केलेले ओळखपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील, तसेच चूकीची माहिती सादर करणे अथवा मान्य केल्यास संबंधीत महाविद्यालयांवर शिस्तभंगाची तसेच दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

क) महाविद्यालयांना माहिती सादर करण्याबाबत खालील प्रमाणे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे,-

1. Last date for registration : 30/09/2018
2. Last date for submission / confirmation of admission details : 30/11/2018
3. Last date for submission of "Processing Fees :
   - i) Without Penalty : 30/11/2018
   - ii) Penalty of 20% : 1/12/2018 to 31/12/2018
   - iii) Penalty of 40% :- 1/01/2019 to 15/01/2019
4. Last date for verification of admission details from concerned Directorate :-
   - i) Those who have submitted proposals without penalty : 15/12/2018
   - ii) Those who have submitted proposals with appropriate penalty : 25/01/2019

ड) वरील वेळापत्रकानुसार महाविद्यालयांनी व संबंधीत ***संचालकांनी कार्यवाही करणे*** अनिवार्य राहिल, तद्नंतर महाविद्यालय अथवा संचालक यांच्याकडून **प्राप्त होणाऱ्या अहवालांचा विचार केला जाणार नाही, तसेच तद्नुषंगाने ज्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यतेअभावी भविष्यात उद्भवणाऱ्या अडचणींस संबंधीत महाविद्यालय/संस्था व संचालक जबाबदार राहील,** असे ठरले.

इ) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनुसार **दिनांक ३१ जानेवारी २०१९** नंतर येणाऱ्या प्रस्तवांचा विचार केला जाणार नाही, अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली.

तद्नंतर सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले

*******